REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017




# महानगरीय साहित्य : प्रेरणा व स्वरुप

प्रा. डॉ.आनंदा गांगुर्डे
विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय, बारामती.

## गोषवारा

*महानगरीय साहित्य म्हणजे महानगरीय संवेदनेचे साहित्य. अखिल महानगराच्या अंत:स्थ समाजजीवनाचे व्यामिश्र प्रतिबिंब ज्या साहित्यात उमटलेले असते त्या साहित्याला महानगरीय साहित्य असे संबोधायला हरकत नाही. साठोत्तर काळात मराठी साहित्याला नवे धुमारे फुटले. वेगळे भान, वेगळया संवेदना, वेगळया जाणिवा व्यक्त करणारे साहित्य लिहिले जाऊ लागले. या काळात मराठी साहित्याच्या एकूणच रुपरंगात अंतर्बाहय स्वरुपाचे मूलभूत बदल होऊ लागले. या प्रक्रियेचाच एक भाग म्हणून महानगरीय जाणिवांच्या विस्तारलेल्या कक्षा मराठी साहित्यात प्रकट होऊ लागल्या. अर्थात त्या अगोदर १९४५ ला बा. सी. मर्ढेकरांनी नवकवितेचे संकेत दिले होते. कोणताही वाङ्मयीन प्रवाह हा अचानक निर्माण होत नाही. त्याला तत्पूर्वीची सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिस्थिती कारणीभूत असते. महानगरीय साहित्याच्या निर्मितीमागे महायुध्दोत्तरकालीन वातावरण होते. अमेरिकेने १९४५ साली जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या दोन शहरांवर अणुबॉम्ब टाकले व ती शहरे बेचिराख करुन टाकली. परिणामी दुसऱ्या महायुध्दाची समाप्ती झाली. या घटनेने संपूर्ण जगात हलकल्लोळ माजला. माणसाचे व एकूणच जीवसृष्टीचे अस्तित्त्व धोक्यात आले. मानवी जीवन उद्ध्वस्त झाले. या क्षणभंगूर जीवनाचे प्रतिबिंब मराठी नवकवितेत उमटले. मराठी नवकवितेचे प्रणेते बा. सी. मर्ढेकर यांच्या 'शिशिरागम' (१९३९), 'काही कविता' (१९४७), 'आणखी काही कविता' (१९५१) या तीनही काव्यसंग्रहांवर महानगरातले दु:ख, दैन्य, दारिद्रय, वैफल्यग्रस्तता, नैराश्यता, बकालपणा आणि विशेषत: दुसऱ्या महायुध्दोत्तर काळातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विषमता यावर प्रकाश टाकला आहे. महायुध्दोत्तर काळात जागतिक वाङ्मयात अशा प्रकारची अस्थिरता चित्रित झाली आहे. मराठी काव्यात ती मर्ढेकरांनी पकडली म्हणून मर्ढेकरांची कविता ही मराठीतील महानगरीय जीवन जाणिवांचा पहिला समर्थ अविष्कार आहे.*

**की वर्डस :** महानगरीय साहित्य, बकालपणा, व्यामिश्रता

महायुध्दोत्तर जीवन, स्वातंत्र्यप्राप्ती, संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, महाराष्ट्र राज्याची स्थापना, औद्योगिक क्रांती व लघुअनियतकालिकांची चळवळ या घटना महानगरीय साहित्याच्या प्रेरणास्थानी आहेत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले.भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या पंचवार्षिक योजनांमुळे संपूर्ण देशात विकासाचे नवे वारे वाहू लागले. भाषावर प्रांत रचनेचा मुद्दा गृहित धरुन संयुक्त महाराष्ट्राची चळवळ फोफावली. पुढे १०५ हुतात्मांच्या बलिदानानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या औद्योगिक धोरणांमुळे मुंबईच्या उपनगरांमध्ये उद्योग – धंदयांची भरभराट वाढली. परिणामी हमखास रोजगार निर्मितीचे शहर म्हणून मुंबईचा बोलबाला झाला. ग्रामीण महाराष्ट्रातून माणसांचे लोंढे मुंबईत स्थिरावले. या गर्दीने मुंबई महानगरात जगण्याचे अनेक प्रश्न निर्माण केले. महानगरीय जीवनाची व्यामिश्रता वाढू लागली. परिणामी हे एक फार मोठे आव्हान महानगरीय साहित्यिकांपुढे निर्माण झाले. अर्थात भाऊ पाध्ये वगळता अन्य कुणालाही महानगरीय जीवनाची व्यामिश्रता शब्दांच्या चिमटीत पकडता आली नाही. मुंबई महानगराचे अजस्त्र अंत:स्थ जीवन पाध्यांच्या कादंबऱ्यांनी आपल्या कवेत घेतले आहे. म्हणून नेमाडे त्यांना सर्वश्रेष्ठ कादंबरीकार मानतात. भाऊ पाध्ये यांच्या मुंबई महानगराच्या चित्रणाबाबत दि. पु. चित्र्यांचा अभिप्राय अत्यंत बोलका आहे. ते म्हणतात, "आणखी तीन – चार हजार वर्षांनी मुंबईचे कोणतेही अवशेष न सापडता भाऊंची पुस्तके मिळाली तर हे शहर आता आहे तसं डोळयासमोर आणता येईल."[१] यातच भाऊ पाध्ये यांच्या महानगरीय कादंबरीचे यश दडले आहे.

महाराष्ट्र राज्यातील मुंबई हे एकमेव महानगर मराठीतील महानगरीय साहित्याच्या केंद्रभागी आहे. याचे कारण मुंबई हे कॉस्मोपॉलिटिन शहर आहे. इथं माणसांची गर्दी आहे, पण गर्दीला चेहरा नाही. चकाचक रस्ते आहेत, भौतिक सुविधा आहेत पण माणसं सुखी – समाधानी नाहीत. पैसा आहे पण मोकळा श्वास घेता येत नाही. आज माणसं जीवंत आहेत पण उद्याची खात्री देता येत नाही. माणसांचे पाय घडयाळाच्या काटयाला बांधलेले आहेत. या महानगराच्या गर्दीत झोपडपट्टीतील बकालपणा आहे. येथे हाताला काम खात्रीशीर मिळेल पण राहायला जागा मिळणार नाही. म्हणून फूटपाथवर, डोंगर उतारावर, सागरी खाडयांच्या किनाऱ्यावर, लोहमार्गालगत, उड्डाणपुलाखाली, मोठमोठया जलवाहिन्यांमध्ये जीव जंतूंसारख्या मानवी वस्त्या वळवळतांना दिसतात. येथे माणसांचे समूह एकत्र राहात असले तरी समूहाचे भावबंध निर्माण होत नाहीत. आजुबाजूला गर्दी असुनही माणसं एकटी असतात. व्यक्तिकेंद्रिंत जगण्यामुळे निर्माण झालेली पोकळी भरुन काढण्यासाठी काम वासना उफाळून येते. असे या महानगराचे जीवनच वेगळे आहे. म्हणून तर ते कवी – लेखकांना आव्हान आहे. वरील महानगरीय संवेदना जयवंत दळवी यांच्या 'चक्र' (१९६३), भाऊ पाध्ये यांच्या 'वासूनाका' (१९६५), मधू मंगेश कर्णिक यांच्या 'माहीमची खाडी' (१९६९), शंकरराव खरात यांच्या 'हातभट्टी' (१९७०), डॉ. भाल पाटील यांच्या 'वस्ती वाढते आहे' (१९७३), ल. ना. केरकर यांच्या 'तो आणि त्याचा मुलगा' (१९८०), रघु दंडवते यांच्या 'वसेचिना' (१९८३), अरुण साधू यांच्या 'झिपऱ्या' (१९९०), आणि बाबुराव बागूल यांच्या 'कोंडी' या कादंबऱ्यांमधून आविष्कृत झालेल्या आहेत. मुंबई या महानगरातील झोपडपट्टीतील दलित, वंचित आणि उपेक्षितांचे जीवन वरील कादंबऱ्यांमधून अभिव्यक्त झाले आहे. परंतु असे असले तरीही भाऊ पाध्ये वगळता इतर कोणत्याही साहित्यिकाला महानगरीय जाणिवांचा प्रभावी आविष्कार मराठी साहित्यात करता आला नाही. या संदर्भात अविनाश सप्रे म्हणतात, "महाराष्ट्रात मुंबई आहे; पण मुंबईत महाराष्ट्र नाही. महाराष्ट्राच्या संदर्भात मुंबई हे औद्योगिकतेचे केंद्र आणि पुणे हे सांस्कृतिक केंद्र अशी जी फारकत आहे, त्यामुळे या दोन्ही महानगरात दुभंगलेपण आले आहे. त्याचा दुष्परिणाम महानगरीय जाणिवांच्या समर्थ आविष्कार न होण्यात झाला असावा,"[२] या ठिकाणी अविनाश सप्रे यांचे मत रास्त व पटण्यासारखे आहे. कारण मुंबईत सांस्कृतिक नीतीमत्ता नाही आणि पुण्यात मुंबईसारखी उद्यमशीलता नाही. अशा दुभंगलेपणामुळे महाराष्ट्रातील महानगरीय जाणिवांच्या आविष्कारात एकसंधपणा नाही.

महानगरीय साहित्याचे आणखी एक महत्त्वाचे प्रेरणास्थान म्हणजे लघुअनियतकालीकांची चळवळ. या चळवळीतील विद्रोहाचे नाते थेट मर्ढेकारांशी जोडले जाते. प्रस्थापितांविरुध्द बंड करण्याचे सामर्थ्य मर्ढेकरांनी दिले. विद्रोह आणि नकार त्यांच्या नसानसात भरलेला असल्यामुळे प्रस्थापित मूल्यव्यवस्थेला त्यांनी जबरदस्त हादरा दिला. नव्या वाङ्मय व्यवस्थेच्या, नव्या अभिरुचीच्या साठोत्तरी कवितेतील बदलत्या प्रवाहांच्या वाटा मर्ढेकरांनी मोकळया केल्या. यातूनच पुढे 'लिटल मॅगझिन' म्हणजे लघुअनियतकालिकांची चळवळ सुरु झाली. 'मौज' आणि 'सत्यकथा' या प्रस्थापित वाङ्मयीन नियतकालिकांच्या विरोधात या लघुनियतकालिकांची निर्मिती झाली. साठोत्तरी कवितेतील बदलत्या प्रवाहांना या चळवळीने बळ दिले. बंडखोरी हे या चळवळीचे प्रमुख सूत्र होते. या लघुअनियतकालिकांविषयी भालचंद्र नेमाडे म्हणतात की, "मराठी लघुअनियतकालिकांनी फार मोठे कार्य केले आहे. आपल्या कोंदट वाङ्मयीन संस्कृतीचा हया चळवळीने दंभस्फोट केला. उत्कृष्ट कवी पुढे आणले. आजचे सगळे मोठे कवी आणि कित्येक गद्यलेखक या चळवळीतले आहेत. नव्या प्रवाहाबद्दल आस्था निर्माण करण्याचं काम या चळवळीने केले आहे."[३] महानगरीय कवितेचे मूळ वसतिस्थान लघुनियतकालिके आहेत. मुंबई महानगरातल्या बंडखोर कवींना या लघुअनियतकालिकांच्या रुपाने एक मुक्त व्यासपीठ मिळाले. त्यातून प्रस्थापित व्यवस्थेविरुध्दचा प्रखर विद्रोह आविष्कृत झाला. या मराठीतील लघुअनियतकालिकांच्या चळवळीने मध्यवर्ती मराठी साहित्यविश्वाला प्रचंड हादरा दिला. 'मौज' आणि 'सत्यकथा' या सारख्या प्रस्थापित नियतकालिकांवर 'वाङ्मयीन वर्णव्यवस्था', 'जातिभेद', 'वर्णभेद', 'धर्मभेद', यांसारखे आरोप झाल्यामुळे त्यांना भूकंपाचे धक्के सहन करावे लागले. मध्यवर्ती प्रस्थापित वाङ्मयव्यवस्था टीकेच्या ऐरणीवर आली. मराठी साहित्यात लघुअनियतकालिकांना सामान्यत: १९५५ साली सुरुवात झाली. रमेश समर्थ यांनी संपादिलेले 'शब्द' हे मराठीतील पहिले लघुअनियतकालिक. १९६० ते १९७० या काळात जवळजवळ ७५ ते १०० च्या आसपास लघुअनियतकालिके असावीत असा अंदाज बांधता येतो. उदा. 'शब्द', 'दिशा', 'रुप', 'अथर्व', 'भारुड', 'टिंब', 'वाचा', 'कावळा', 'स.न.वि.वि.', 'अबकडई', 'शून्य', 'त्रिशंकू', 'रावा', 'विद्रोह', 'दिंडी', 'आदिम', 'कविता', 'साहित्यसंवाद', 'ब्र', 'धुमकेतू', 'उद्गार', 'संवाद', इ. या आणि असे कितीतरी लघुअनियतकालिके निघाली असण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील प्रमुख शहरांतून ती निघत असली तरी मुंबईहून निघणाऱ्या लघुअनियतकालिकांची संख्या तुलनेने अधिक आहे. त्यामुळे महानगरीय जाणीव अतिशय तीव्रपणे त्यातील कवितांमध्ये व्यक्त झालेली दिसते. दिलीप चित्रे, अरुण कोलटकर, भालचंद्र नेमाडे, चंद्रकांत पाटील, वसंत गुर्जर, वसंत आबाजी डहाके, तुलसी परब, चंद्रकांत खोत, सतीश काळसेकर, अशोक शहाणे, नामदेव ढसाळ, मनोहर ओक, विजय कारेकर, रमेश समर्थ, राजा ढाले, परेन जांभळे, शांताराम बर्डे, चंद्रकांत कल्लोळी, अनंत आमदाबादकर, विलास केळकर, आदी लघुअनयिताकालिकातील कवींनी आपल्या कवितेतून महानगरीय संवेदन प्रकट केले आहे. महानगरीय जीवनामुळे निर्माण झालेला वैताग, त्रागा, विषमता, विषण्णता, मनाला आलेली सुन्नता, मूल्यऱ्हास, बकालपणा, भंपकपणा, असुरक्षितता, उपरेपणा, इ. महानगरीय संवेदना या कवितेतून व्यक्त झालेल्या आहेत.

दिलीप पुरुषोत्तम चित्रे; 'कविता' (१९६१), 'कवितेनंतरच्या कविता' (१९७८), वसंत आबाजी डहाके; 'योगभ्रष्ट' (१९७२), 'शुभवर्तमान' (१९८७), अरुण कोलटकर; 'जेजुरी' (१९७६), 'अरुण कोलटकरांच्या कविता' (१९७७), भालचंद्र नेमाडे; 'मेलडी' (१९७०), 'देखणी' (१९९१), चंद्रकांत पाटील; 'निस्संदर्भ' (१९७३), 'इत्यंभूत' (१९८२), 'बायका आणि इतर कविता' (१९९३), वसंत गुर्जर; 'गोदी' (१९६७), 'निव्वळ' (१९७०), 'अरण्य' (१९७३), 'समुद्र' (१९७९), मनोहर ओक; 'आयत्या कविता' (१९७०), तुलसी परब; 'हिल्लोळ' (१९७३), सतीश काळसेकर; 'इंद्रियोपनिषद' (१९७०), 'साक्षात' (१९८२) या आणि अशा अनेक कवींच्या कवितांमधून महानगरीय जाणिवा अधोरेखित झालेल्या आहेत. याशिवाय मलिका अमर शेख ('पुन्हा एका शहराची आत्महत्या'—'वाळूचा प्रियकर'), सुनंदा भोसेकर ('महानगर'—'अनोळखी प्रदेशात'), अंजली कीर्तने ('शहराच्या पोटात'—'अंत:स्थ'), अरुणा ढेरे, ('आता काय होईल', 'निरंजन') अंजली

कुलकर्णी; ('केवढे गजबजून गेले आहे हे शहर', — 'अस्वस्थ आत्मा') इत्यादी कवयित्रींनी महानगरीय जाणिवा आपल्या कवितांतून आविष्कृत केलेल्या आहेत.

दि.पु. चित्र्यांच्या अनुभवविश्वात मुंबईला विशेष महत्त्व आहे. मुंबईच्या जीवनातील वेगवेगळया स्तरातील जीवनाचा ते वेध घेतात. माणसांची आक्रमक गर्दी, तिची कीटक सदृश्यता, दिशाहीनता, बकालपणा ते न्याहाळतात. भयभीत करणारा महानगरीचा प्रचंड यांत्रिक, विद्रूप डोलारा ते चित्रित करतात.

शहराच्या पोपडे पडलेल्या विराट दालनातून
सरपटणाऱ्या गर्दीचे लक्ष खुरटे स्तन चाचपताना,
आणि तिच्या मांडीवरुन आपला तळहात फिरवताना

असा विचित्रसा अनुभव प्रकट करतात. लघुअनियतकालिकांच्या चळवळीतून पुढे आलेल्या कवींमध्ये अरुण कोलटकर हे महत्त्वाचे नाव. मुंबईतील सततच्या वास्तव्यामुळे महानगरी संवेदनेचा विद्रोही आविष्कार त्यांच्या काव्यातून प्रकट झाला आहे. समकालीन प्रस्थापित भावकवितेवर पोसलेल्या मराठी काव्याभिरुचीला जाणीवपूर्वक प्रचंड धक्का कोलटकरांच्या कवितेने दिला आहे.

चिखल ठरलो भिक्षापात्र भटकलो भाग्यहीन
वाक्यहीन वाळवंटी अनवाणी आकाशवाणी
पिऊन आरशांची निवळी झालो गोसावी सावकाश
सुर्याच्या भुकेचा झाडपाला ओरबाडला
अंगाखांदयावर खेळवला महारोग निरवली सावली

अशा असलग विश्वात व्यक्तीचे अस्तित्त्व असते. गुदमरलेल्या प्रातिनिधिक शहरी व्यक्तिमत्त्वाचे आपल्या काव्यातून ते दर्शन घडवितात. शहराकडे धावणारी गर्दी, मूल्यविवेक संपलेली माणसं आणि चक्रात पिळून निघालेले जीवन रेखाटतांना ते भडक स्वरुपाचा दंभस्फोट करतात. यंत्रयुगातील प्रेमाला येणारे वासनेचे स्वरुप आणि तिच्या तृप्तीसाठी आलेली अगतिक धडपड याची वैयक्तिक पातळीवर दखल घेताना ते लिहितात, ''टचकन उमलते बेवारशी तृप्ती, पाण्यात झुगारलेल्या सिगारेटसारखी, पिकतात खपतात जन्मांध वांगी तृष्णाकाठी, स्पर्शजन्य कमळे एकामागून एक तोडत निळीफोल घोडी जाते, नसानसात चिवचिवणारी व्हीनस नासून जाते.'' अशा प्रकारे महानगरातल्या अस्थिर आणि मूल्यहीन जीवनात स्त्रीपुरुषांच्या मनोभावांची व कामभावाची कायम होणारी विटंबना त्यांच्या अनुभूतीचा विषय होते.

वसंत आबाजी डहाके यांनी १९६० पासून काव्यलेखनाला प्रारंभ केला. 'योगभ्रष्ट' (१९७२), 'शुभवर्तमान' (१९८७), 'शुन:शेप' (१९९६), 'चित्रलिपी' (२००६) या चारही काव्यसंग्रहांवर अस्तित्त्ववादाची गडद छाया आहे. मुंबई महानगरीतील वास्तव्यामुळे त्यांना गर्दीतील अस्वस्थता बेचैन करतांना दिसते. मनाची उद्ध्वस्त अनुभूती गडद होताना दिसते.

नरकाची हिरवट काळी झाक असलेलं शहर
मला निवडून दिलं गेलंय
आणि मी ते स्वीकारलंय बंद ओठांनी
ललाटरेषेसारखं

सर्वांना क्षुद्र करुन शेवटी भक्ष्य बनविणारे हे शहर कवीने जाणीवपूर्वक स्वीकारले आहे. कोलकाता या महानगरात काही काळ डहाक्यांचे वास्तव्य होते. याविषयी ते म्हणतात, ''कलकत्ता मला एखाद्या अजस्त्र दु:खी जनावरासारखं वाटलं. वेदना तीव्र झाली की घशातून अस्पष्ट घुरघुरणारं.'' ('यात्रा—अंतर्यात्रा', पृष्ठ:८७) यावरुन वाङ्मय, नाटय, कला क्षेत्र सोडून डहाके इतर क्षेत्रात फारसे रमतांना दिसत नाही. त्यांच्या कवितेला 'अस्वस्थ शतकाची कविता' असे संबोधताना अभिजित देशपांडे म्हणतात, ''महानगरांचे असंख्य तपशील डहाक्यांच्या कवितांत होत असले तरी महानगरी जाणिवांचा फारस कुठलाही ठसा त्यांच्या कवितांवर उमटला नाही. चंद्रपूरपासून सोबत करणारं तुटलेपण, एकाकीपण या महानगरांनी कोडकौतुकाने वाढवलं 'भोवतीच्या या असंबध्द पसाऱ्याची जाणीव' इथेच विस्तारली. हेच या महानगराचं देणं''[४]. डहाके यांची ही आत्मिक अस्वस्थता प्रातिनिधिक स्वरुपाची आहे. विसाव्या शतकाची ती केविलवाणी तडफड आहे.

भालचंद्र नेमाडे यांच्या 'मेलडी' (१९७०), 'देखणी' (१९९१) या काव्यसंग्रहातील कवितांमध्ये महानगरीय जाणिवा जाणवतात. लघुअनियतकालिकातील कवितेतून नेहमी प्रत्ययाला येणारा महानगरी संवेदनेतील सर्वव्यापक शून्यतेची आणि संपूर्ण निरर्थकतेचा प्रत्यय या कवितेत एक वेगळे परिमाण धारण करतो. नेमाडयांच्या भावपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे दर्शन त्यांनी साकार केलेल्या सभोवतालच्या नीरस वास्तवदर्शनामुळे उलट पध्दतीने घडून येते. 'वाचा', 'असो' या लघुअनियतकालिकांच्या संपादनात व प्रकाशनात नेमाडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या एकूणच साहित्यात महानगरीय जाणिवा प्रगल्भपणे व्यक्त झालेल्या आहेत. चंद्रकांत पाटील यांच्या 'नि:संदर्भ' (१९७३) या पहिल्याच संग्रहात महानगरी संवेदनेची चाहूल लागते. दिशाहीन सुन्न रिकामेपणाचा प्रत्यय वारंवार त्यांच्या कवितेतून प्रगट झालेला आहे. महानगरीय गर्दीतील कामांधपणाला त्यांनी कधी थारा दिला नाही. प्रेमाच्या माध्यमातून स्वसंवेदनांचे आणि आत्मशोधांचे पदर शोधतांना कवी दिसतो. शारीरिकतेच्या या जाणिवेला फारसा स्पर्शच होत नाही किंवा ती शारीरिकता नाकारण्याची जाणीव,

''मी हे सरळच सांगून ठेवतो की मी अस्पर्श,
हरवलो नाही कधीच कुणाच्या स्पर्शाच्या जंगलात ।
ओठांवरल्या लालस लवलवीने ऊब दिली नाही ।
भिजलो नाही चोरटया संभोगक्षणांच्या पावसात ।''

अशा रीतीने काव्यानुभूतीचा विषय होते. पाटलांचा एकूण प्रेमानुभव वैफल्यग्रस्त आहे. महानगरी संवेदनेचा स्फोटक आणि दुखरा आविष्कार वसंत गुर्जरांनी आपल्या पहिल्याच 'गोदी' (१९६७) या संग्रहात केला आहे. तळागाळातील दरिद्री माणसांच्या संदर्भशून्य जीवनाचा आलेख गुर्जरांनी या काव्यसंग्रहात रेखाटला आहे. पशुतुल्य हीनदीन अवस्थेत आपले सत्व व स्वत्व गमावून बसलेला, अन्नवस्त्राच्या विवंचनेतच पूर्णपणे गारद झालेला महानगरीय झोपडपट्टीतील वंचित माणूस व त्याच्या भोवतीचे गचाळ, विद्रूप वातावरण यांचे वास्तव चित्रण गुर्जर करतात. मनोहर ओकांच्या 'आयत्या कविता' (१९७०) या संग्रहातील कविता संपूर्णपणे महानगरी संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात. 'मुंबई' या कवितेत या विरुप नगरीतील अधोजीवनाचे फार प्रत्ययकारी वर्णन आले आहे. ''मुंबई ! मुंबई ! मुंबई ! । एक नगरी नखुरडं उगवलेलं नशीबवान । एक शहर—जहर निभ्रांत.'' असं ते मुंबईचं वर्णन करतात. मुंबईतील अठरा पगड जातीचे लोक, शेअर बाजाराची तेजी—मंदी, दहशतवादी टोळया, गुंड, वेश्या बाजार चित्रित करतांना मुंबईच्या श्रीमंतीचे आणि अध:पतित संस्कृतीचे वास्तव चित्रण करतात. ''मुंबई मुंबई मी तुझ्यातून फाटका भणंगासारखा निघून जाईन'' असा आत्मपरीक्षणाचा भविष्यदर्शी निष्कर्ष ते काढतात. तो निष्कर्ष केवळ कवीच्या संदर्भातीलच नसतो तर एकूण सामान्य माणसाच्या वाटयाला मुंबईसारख्या महानगरीने दिलेले ते फलित असते. महानगरी जाणिवेचा

तीव्र आविष्कार तुलसी परब यांच्या 'हिल्लोळ' (१९७३) या काव्यसंग्रहात आला आहे. महानगरीय उपेक्षित जीवनाचे दु:ख, दारिद्रय आणि गांजलेल्या माणसांचे उपरे जगणे परब अधोरेखित करतात,

''टी बी हा माझा जन्मसिध्द हक्क आहे ।
दारिद्रयाचे आम्ही वारसदार ।
आम्ही अश्रूंचे महासागर ।
दु:खाचे ग्लेशिअर्स ज्यात आकंठ बुडाले
आम्ही फक्त मलेरियाची चैन
किडा मुंगी जीवजंतू सर्व आपले बांधव आहेत, भूकेसहित.''

अशा जळजळीत शब्दात ते महानगरीय माणसांच्या दु:खाचा पाढा वाचतात. चंद्रकांत खोत यांचे वास्तव्य मुंबई शहरात असल्यामुळे त्यांच्या 'मर्तिक' (१९६९), 'अपभ्रंश' (१९७३) या काव्यसंग्रहावर महानगरीय संवेदनांचा प्रभाव जाणवतो. ते स्वत:ला मराठीतील लिट्ल मॅगझिन्सनी दाखविलेल्या बंडखोरीच्या पालखीतील एक सामान्य वारकरी मानतात. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत शारीरिक पातळीवर शोषण झालेल्या स्त्रीचे चित्रण त्यांच्या काव्यातून प्रगट झाले आहे. मुंबईच्या रस्त्यावरील प्रश्नांनी खोत अस्वस्थ होताना दिसतात. महानगरीय जाणिवांचा व्यापक पट सतीश काळसेकर यांच्या कवितेत जाणवतांना दिसतो. त्यांच्या 'इंद्रियोपनिषद' (१९७०), 'साक्षात' (१९८२) या काव्यसंग्रहातून महानगरीय जीवनाची लैंगिक अपरिहार्यता ते चित्रित करतात. सामाजिक आणि नैतिक भयामुळे स्वाभाविक लैंगिक संवेदनांना दडपून टाकणाऱ्या संस्कृतीच्या विरुध्द काळसेकर बंड करुन उठतात. या दृष्टीने त्यांच्या काव्यसंग्रहाचे 'इंद्रियोपनिषद' हे नाव अन्वर्थक आहे. प्रभावी आणि उन्मत्त करणाऱ्या लैंगिक प्रेरणा महानगरीय गर्दीचा आवश्यक भाग असतो. यासाठी काळसेकर बेगडी मूल्यव्यवस्थेच्या विरुध्द पेटून उठतात.

वरील कविंव्यतिरिक्त मलिका अमरशेख ('वाळूचा प्रियकर'), सुनंदा भोसेकर ('अनोळखी प्रदेशात'), प्रज्ञा लोखंडे ('अंत:स्थ'), अंजली कीर्तने ('हिरवी गाणी') इ. कवयित्रींनी महानगरीय जाणिवा व्यक्त केलेल्या आहेत.

''दूर शहर पेटलेलं, मध्ये समुद्र
शहर तगमगत उभं......
माझ्याकडे स्वप्नं आहेत
पण त्यांना जमीन नाही
तुझ्याकडे जमीन आहे
पण कोण मशागत करणार त्याची?''

मलिका अमरशेख या आविष्कारात शहर आणि शहरवासी यांच्यातील एकात्मतेचे नाते पेलू न शकणरी एक आर्त असहाय्यता जाणवते. शहरवासीयांची स्वप्ने व त्यांना साकार करण्याची महानगरीय संस्कृतीची असमर्थता त्यातून दिसते. सुनंदा भोसेकरांच्या महानगरीय जाणिवेत परात्मभावाची परिसीमा दिसून येते.

''माझा असा सिध्दांत आहे की
हे शहर माणसाच्या रक्तात मुरत नाही
शहराच्या रस्त्यावरुन सैरभैर होतांना''

माणूस आणि महानगर यांचे रक्ताचे नाते अशक्य आहे. असेच सुनंदा भोसेकर यांना सांगायचे आहे. महानगरीय संस्कृतीच्या दु:खबधिर व माणुसकीशून्य वृत्तीला प्रज्ञा लोखंडे दाहक उपरोधाने सलाम करतात.

''पंचतारांकित दु:खाची झालर पांघरुन
पोरक्या स्वप्नांना लिलावात मांडलं जातं
महानगर तरीही निमूट असतं
शेवटी आपण असतो
हस्तिदंती मनोऱ्यातलं आयुष्य भोगत''

अशा प्रकारे महानगरातील कंगाल झोपडपट्टयांचे व फूटपाथांचे उपेक्षित जीवन कवयित्री प्रकाश झोतात आणते. या महानगरीय अमानवीकरणाच्या प्रक्रियेकडे महानगरवासीही निमूटपणे बघत असतो. याची अपराधी भावना कवयित्रीला अस्वस्थ करते. अर्थात महानगरीय वास्तवाची पुरेपूर जाणीव उपरोक्त कवयित्रींना झालेली आहे असे नाही. याविषयी रा.ग.जाधव म्हणतात, ''बहुसंख्य कवयित्रींची मानसिक जडणघडण ही नागरी व महानगरीय पर्यावरणातच झालेली दिसते. तथापि महानगरीय संस्कृतीचा कवयित्रींच्या अंत:रथ विश्वात पुरेपुर शिरकाव झालेला नाही.''[५] महानगरीय कवींच्या तुलनेत कवयित्रींचा अनुभव महानगरातल्या उघडया नागडया वास्तवाला भीडत नाही.

एकूणच महानगरीय साहित्य अतिशय प्रगल्भ व वास्तववादी आहे. प्रस्थापित मूल्यव्यवस्थेविरुध्दचा विद्रोह हे त्याचे मुलभूत सूत्र आहे. प्रचंड राग व पराकोटीचा संताप यामुळे या साहित्यातून लैंगिकतेचा पुरस्कार केला आहे. त्यामुळे ते प्रस्थापितांना अश्लील वाटते. परंतु ज्यांचे जीवनच उघडे नागडे आहे. त्यांची भाषा ओंगळवाणी असणे साहजिकच आहे. उदा. भाऊ पाध्ये यांची 'वासूनाका' (१९६५). संस्कृतीच्या गोंडस नावाखाली या साहित्यिकांचा भावनिक उद्रेक आपणांस दडपता येणार नाही. जीवनाची निरर्थकता या महानगरीय कवींना प्रकर्षाने पटली आहे. ईश्वरावर त्यांची श्रध्दा नाही व प्रस्थापित संस्कृतीवर त्यांचा विश्वास नाही. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, मानसिक विषमता यामुळे त्यांचा संयम सुटून जातो व शेवटी ते लैंगिक जाणिवांचे मुक्त प्रगटीकरण करतात. त्यांच्याविषयी माडखोलकर म्हणतात, ''आधुनिक काळातील हे बंडखोर संतप्त कवी, विशिष्ट अवयवांच्या आणि त्यांच्या क्रियांचा जो उल्लेख आणि उपयोग वारंवार करतात त्याचे कारण आणि औचित्य मात्र खरोखरी कळत नाही. अशा ग्राम्य आणि गलिच्छ लिखाणाने त्यांच्या मन:क्षोभाचा निचरा होत असेल तर गोष्ट वेगळी''[६] मानसिक संतापाचा निचरा होण्यासाठी हे कवी लैंगिकतेचा आश्रय घेतांना दिसतात. मराठीतील लघुअनियतकालिकाच्या चळवळीने महानगरीय कवितेचे भरण पोषण केले. आशय अणि अभिव्यक्तीच्या संदर्भात या कवींची कविता समृध्द आहे. प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधातील बंडखोरीच्या बाबतीत तिचे नाते थेट मर्ढेकरांशी जुळणारे आहे. म्हणून मर्ढेकर हे महानगरीय साहित्याचे मुख्य प्रेरणास्थान आहे. महानगरीय कादंबरी आणि महानगरीय कविता या दोन्ही साहित्य प्रकारात महानगरीय साहित्यीकांनी मर्ढेकरांचेच अनुयायित्व पत्करलेले आहे. अर्थात काळाच्या ओघात बंडखोरीच्या संदर्भात पुढे या साहित्यिकांनी मर्ढेकरांच्या पुढचे पाऊल टाकले आहे. याविषयी डॉ. अक्षयकुमार काळे म्हणतात, ''समग्रपणे या कवितेकडे बघता ती मर्ढेकर कुलोत्पन्न असल्याचे जाणवते. ती मर्ढेकरांचे संपूर्ण अनुयायित्व करते असे नाही. मर्ढेकरी वास्तव दर्शनात सांस्कृतिक मूल्यांच्या आदर्शनाने मर्ढेकरांचा झालेला तडफडाट अभिव्यक्त झाला होता. या कवींनी मात्र मूल्यांनाच उपहासाने आणि तुच्छतेने नाकारले आहे.''[७] मर्ढेकरांचा विद्रोह केवळ सांस्कृतिक होता तर महानगरीय कवींचा विद्रोह सामाजिक आणि भांडवलदारी व्यवस्थेच्या विरोधात आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित करुन वैश्विक मानवतावाद निर्माण

करण्यासाठी महानगरी कवितेने बंड पुकारले आहे. तात्पर्य; मराठी लघुअनियतकालिकांच्या चळवळीला आलेले वाङ्मयीन फळ म्हणजे महानगरीय जाणिवांच्या कविता होय.

## संदर्भ सूची

१. चित्रे दि. पु., “समकालीन आणि बाकीचे सगळे”, उगवाई, वर्ष – ११, अंक – २, १९८८, पृ. २०.
२. सप्रे अविनाश, “महानगरीय जाणिवा आणि मराठी साहित्य”,
“साहित्य आणि समाज” (सं) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रतिमा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती १३ मे २००७, पृ. २०७.
३. नेमाडे भालचंद्र, “टीकास्वयंवर”, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २००९, पृ. ३५४.
४. देशपांडे अभिजित, ‘‘अस्वस्थ शतकाची कविता’’, लोकवाङ्मय गृह प्रकाशन,मुंबई, प्रथम आवृत्ती : १ सप्टेंबर १९९६, पृष्ठ : १०३.
५. जाधव रा.ग., ‘‘आधुनिक मराठी कवयित्रींची कविता’’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १ सप्टेंबर १९९६, पृष्ठ १०३.
६. माडखोलकर ग.त्र्यं. लिटल मॅगझिन्स, ‘‘ललित’’, मुंबई पृष्ठ : ८.
७. काळे अक्षयकुमार, ‘‘अर्वाचीन मराठी काव्यदर्शन’’, पां.ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती : १९९९, पृष्ठ : ५३५.